Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC

# जलव्यवस्थापनाविषयी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**प्रा. डॉ. सतिश हरलाल पारधी,** कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम, पाटील कला महाविद्यालय, मारवड ता. अमळनेर जि.जळगाव

## प्रस्तावना

निसर्गत: मानवाला नैसर्गिक संसाधनांच्या रूपाने मोफत अशी देणगी मिळाली आहे. भारतात नैसर्गिक संसाधने मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. ज्यात नद्या,पर्वत,डोंगररांगा,खणीजसंपत्ती,वने यांचा समावेश होतो. भारताला निसर्गाने भरभरून दिले आहे. भारताच्या हवामानाचा विचार करता, उन्हाळा,पावसाळा,हिवाळा असे तीन ऋतु साधारपणे दिसून येतात. पावसाळा जून ते सप्टेंबर या चार महिन्यात असतो. या चार महिन्यात भारतात सर्वच प्रदेशांमध्ये कमी अधिक प्रमाणात पाऊस पडतो.

नदी, तलाव, शेततळे, विहीर यांच्या माध्यमातून जे पाणी गोळा होते त्याला भूपृष्टीय जल तर जमिनीच्या भूगर्भात झिरपलेल्या पाण्याला भूगर्भिय जल असे म्हटले जाते. पावसाचे पडणारे पाणी काही नदी,तलाव,शेततळे,विहीर,धरणे,कालवे यांच्यात साठविले जाते. तर बरेचसे पाणी समुद्रात वाहून जाते. भारतात गोड्या पाण्याचे प्रमाण कमी आणि क्षारमय पाण्याचे प्रमाण अधिक आहे.

पाण्याचा वापर पिण्यासाठी, ऊर्जानिर्मितीसाठी, उद्योगासाठी, स्वच्छतेसाठी, वाहतुकीसाठी, शेतीसाठी केला जातो. या सर्वांमध्ये पाण्याचा अधिक वापर शेतीसाठी होत असल्याचे दिसते. पृथ्वीच्या एकूण पृष्ठभागापैकी ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला आहे. असे असले तरी मानवी जीवनात उपयूक्त पाणी साठयाचे प्रमाण कमी असून एकूण उपलब्ध पाण्याच्या २.८ टक्के पाणी गोड्या पाण्याच्या स्वरूपात उपयूक्त आहे. ९७.२ टक्के समुद्रिय भागात म्हणजे क्षारमय स्वरूपात आहे.

असे म्हटले जाते की जल है, तो कल है उद्याचा दिवस पाण्यासाठी संघर्ष करणारा असेल. येणाऱ्या प्रत्येक सजीवाला पाण्याची गरज निर्माण होत असून पावसाचा पडणारा प्रत्येक पाण्याचा थेंब जमिनीत जिरवणे आवश्यक आहे. "पाणी आडवा, पाणी जिरवा" या युक्तीप्रमाणे भूगर्भातील पाण्याच्या पातळीत घट होत असतांना पाणी अडवून जमिनीत पाणी जिरवणे आवश्यक आहे. काही विचारवंतांच्या मते येणाऱ्या काळात पाण्याची भीषण टंचाई निर्माण होऊन पिण्याच्या पाण्यासाठी युद्ध देखील होऊ शकते. आपल्या भारत देशाला महापुरुषांचा एक मोठा वारसा लाभला आहे. महात्मा गांधी आणि डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जलसिंचनाच्या प्रमाणात वाढ करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपाय सांगितले जे आज देखील दिशादर्शक असे आहे.

## संशोधनपद्धती

भारतातील जलसिंचनाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक सामग्री ऐवजी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, संदर्भ ग्रंथ यांचा समावेश आहे.

## संशोधनाचा उद्देश

१. महात्मा गांधी यांच्या जलसिंचनविषयक उपायांचा अभ्यास करणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविलेल्या जलसिंचनविषयक उपायांचा अभ्यास करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संशोधनाची गृहितके**

प्रस्तुत लघु शोधनिबंधासाठी पुढील गृहितांचा आधार घेण्यात आला आहे.

१. महात्मा गांधी यांनी जलसिंचणविषयक समस्या सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजणांची आज देशाला गरज आहे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टि विचारातून जलसिंचनात वाढ होईल.

**महात्मा गांधी**

सन १९१५ मध्ये जेव्हा महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले. तेव्हा संपूर्ण देशाची परिस्थिति जाणून घेण्यासाठी संपूर्ण देशभर भ्रमंती केली. भारतातील विविध समस्या,संस्कृति,लोकजीवन यांची त्यांना ओळख झाली. भ्रमंती दरम्यान त्यांच्या असे लक्षात आले की, भारत खऱ्या अर्थाने खेड्यात वसलेला देश आहे.

महात्मा गांधी यांनी  ग्रामविकासाचा विचार मांडतांना ग्रामस्वराज्य माध्यमातून खेडी समस्या मुक्त करून ग्रामीण जीवनात चैतन्य निर्माण झाले पाहिजे अशी अपेक्षा केली. देशाचा जलद गतीने विकास झाला पाहिजे परंतु हा विकास पर्यावरणपूरक असला पाहिजे असे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना नेहमी वाटत असे. ब्रिटिशांच्या स्वार्थी धोरणामुळे देशातील पर्यावरणाचा समतोल बिघडून मान्सून पर्जन्यावर विपरीत परिणामाची चाहूल लागली होती.

पर्यावरणाचे पुरस्कर्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खेड्यातील जल आणि जमीन सुरक्षित ठेवण्यावर भर दिला. पाणी ही मानवाची आवश्यक गरज आहे. पाण्याशीवाय सजीव नाही. शहरी भागातील व ग्रामीण भागातील लोकांची पाण्याची गरज लक्षात घेता नद्यामधील वाढते प्रदूषण थंबविले पाहिजे. औद्योगीक क्षेत्रातील दूषित पाणी नद्यांमध्ये सोडल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या वाढली आहे. महात्मा गांधी स्वच्छतेचे आग्रही होते. ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेती असून शेतीच्या प्रगतीसाठी जलसिंचनाच्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक असून पावसाच्या पडणाऱ्या पाण्याचे नियोजन होणे तेवढेच महत्वाचे आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या बारा बलुतेदाराच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न पाण्याशी निगडीत आहे. त्यामुळे जलसिंचन साधनांमध्ये वाढ झाली पाहिजे व ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे यासाठी महात्मा गांधी यांचे योगदान मोलाचे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

सन १९४२-१९४६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम,जल व विद्यूत या महत्वाच्या विभागाचे मंत्रि होते. दुसऱ्या महायूद्धानंतर केंद्र सरकारने “यूद्धोत्तर आणि     पुर्नरचना योजना “ अंमलात आणली . या योजना समितीत एकूण पाच सदस्य होते. या योजना समितीच्या एकूण पाच सदस्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक होते. देशाला विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी योग्य अश्या दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता होती. या बरोबरच श्रम आणि विद्यूत मंत्रालयात देखील धोरण समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. देशाच्या आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे आणि भूमिकांसाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहविचार सभा घेण्यात आल्या. भारतातील प्रचलित असलेल्या ग्रामपद्धतित सुधारणा झाली पाहिजे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नेहमी वाटत असे त्यांनी त्यांच्या दुरदृष्टिकोणातून दीर्घ नियोजन आणि विकासावर लक्ष केंद्रित केले.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC

भारतात अनेक नद्या आहेत. यातील काही नद्या हंगामी तर काही बारमाही अशा आहे. नद्यांना पावसाळ्यात मोठे महापुर येतात. याकाळात मोठ्या प्रमाणात नद्यांना पाणी असते. उन्ह्याळ्यात मात्र बऱ्याचश्या नद्या कोरड्या असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दामोदर नदीच्या संदर्भात पूर्ण अभ्यास केला. नदीला आलेल्या पुरामुळे अनेकांचे प्राण व आर्थिक नुकसान होते असे त्यांच्या लक्षात आले. १९४४-४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या विभागाने दामोदर,सोन,महानदी व इतर नद्यांच्या खोरे प्रकल्पाशी संबधित अशा पर्याप्त बहुउद्देशीय नदी खोरे विकासावर भर देणारे पायाभूत काम पूर्ण केले. पाश्चिमात्य देशाचा विकास पाण्याने झाला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. पाण्याशिवाय कृषि,उद्योग,पायाभूत सुविधेत वाढ होणार नाही. यासाठी त्यांनी बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्पावर भर दिला.

दामोदर प्रकल्पाच्या संदर्भात कलकत्ता येथील परिषेद दिनांक.३ जानेवरी १९४४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करता की, आतापर्यंत समित्यांनी महापूर नियंत्रित करून जीवित हानी होणार नाही यावर उपाययोजना मांडल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यापुढे विचार मांडतात की, महापूराचे नियंत्रण करून जीवित हानी तर थांबली पाहिजे शिवाय,त्या पाण्यावर विजनिर्माण करणे,सिंचनासाठी पाण्याचा उपयोग करणे,जलवाहतुक व औद्योगिक वापरासाठी पाण्याचा उपयोग झाला पाहिजे जेणेकरून देशाचा विकास होण्यास मदत होईल. नदीच्या पाण्याचा वापर शेती,विद्युत आणि वाहतुकीसाठी करता यावा यासाठी त्यांनी दामोदर नदी प्रकल्पाची शिफारस केली.

ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतीला जर पाणी मिळाले तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होवून त्यांच्या राहणीमानात साधारणा होईल व ग्रामीण भाग प्रगती करेल असा आशावाद त्यांना होता. जलसिंचणविषयक धोरण राबवून दुरदृष्टिकोणातून देशाच्या सर्वांगीण विकासावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लक्ष केंद्रित केले. विद्युत शक्ति धोरणात गोरगरीब लोकांना स्वस्त आणि मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. या धोरणामुळे देशातील गरीब,दारिद्रयात जीवन जगणाऱ्या लोकांना देखील जीवन जगण्याचा अधिकार मिळाला याचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.

**निष्कर्ष**

देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर अवलंबून असतांना शेतीचा विकास करण्यासाठी सर्वात आधी जलसिंचनविषयक दीर्घकालीन धोरण आखणे आवश्यक असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेधले होते. फक्त बहुउद्देशीय जलसिंचन प्रकल्पाचा फायदा शेतीलाच होणार होता असे नाही. शेतीबरोबर उद्योग,ऊर्जा,वाहतूक क्षेत्राचा देखील विकास आणि विस्तार होण्यास मदत होणार असल्याचे निश्चित झाले.

पाणी प्रश्नावरून राज्याराज्यामध्ये संघर्ष निर्माण होवू नये यासाठी सेंटर वॉटर इरीगेशन स्थापन करून प्रादेशिक विषमता दूर करून सर्व राज्याचा समान पातळीवर विकास होण्यासाठी त्यांनी यशस्वी नियोजन केले. जलसिंचनाच्या माध्यमातुन देशाचा विकास होवू शकतो हे त्यांनी वेधले होते.

जे स्वप्न महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिले होते ते अजुन तरी पूर्ण झालेले दिसत नाही. १९५०-५१ पासून जलसिंचनासाठी मोठे धरण बांधणे,पुराचे नियंत्रण,वीज निर्मिती,पाटबंधारे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. वास्तविकता शेती,उद्योग,जलवाहतुक,ऊर्जानिर्मिती


Copyright © | JET Network, All Rights Reserved

क्षेत्रात प्रकल्पाचे योगदान पुरेसे नाही. आज देखील जलसिंचनाचे अनेक प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहे. राजकीय स्वार्थापोटी असे प्रकल्प पूर्ण होत नाही. परिणामी देशातील बऱ्याचश्या लोकांना उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकंती करावी लागते. गोड्या पाण्याची उपलब्धता कमी आणि मागणी जास्त आहे. अशावेळी समुद्राचे पाणी गोड बनविण्यासाठी प्रकल्प स्थापन होणे गरजेचे आहे. जलप्रदूषण हा विषय देखील तेवढाच महत्वाचा आहे. नद्यांना प्रदूषण मुक्त करण्याची वेळ आली आहे. आज जर महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याची वेळ आली आहे. योग्य जलसिंचनातून शेती,उद्योग,वाहतूक,ऊर्जा निर्मितीबरोबर स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटू शकतो.

**संदर्भ**

१. ग्रोवर बी. एल, बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास एक नवीन मूल्यमापन(२००८),एस. चंद अँड कंपनी,प्रा. लि. नई दिल्ली. पृष्ट. क्र. ४२१-४२३ .
२. जाधव श्रीराम,गांधीजी आणि सामाजिक समता(२००९),महात्मा गांधी अध्ययन केंद्र, औरंगाबाद पृष्ट. क्र.२९५.
३. इंगळे एम. आर,वर्तमान परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आवश्यकता(२०१२), प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव पृष्ट. क्र.५०५-५०६.
४. थोरात सुखदेव,बाबासाहेब आंबेडकर नियोजन,जल,व विद्युत विकास भूमिका व योगदान(२००५),सुगावा प्रकाशन पुणे. पृष्ट. क्र.३०,३४,३५,११६,१७३.
५. पाटील महेंद्र,महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अध्ययन(जुलै २०१९),अथर्व पब्लिकेशन्स,जळगाव. पृष्ट क्र.१७३.
६. पाटील गंगाधर कायंदे,भारतीय अर्थव्यवस्था(२००२), चैतन्य पब्लिकेशन्स,नाशिक. पृष्ट क्र.२.८.
७. कमल कुलश्रेष्ठ,योजना (एप्रिल २०२४),भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे,प्रसीध्द,बेलापुर. पृष्ट क्र.१८,१९.
८. कोंडेवार यू.बी,भारतीय अर्थव्यवस्था( जुलै २००३),चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद पृष्ट क्र.२९.


Copyright © | JET Network, All Rights Reserved